# 14. चित्रालेख

क्रिकेटच्या एका सामन्यात तीन गोलंदाजांनी केलेल्या गोलंदाजीची, त्यांना मिळालेल्या बळींची व त्यांनी दिलेल्या धावांची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

| गोलंदाज | षटके | दिलेल्या धावा | घेतलेले बळी |
|---|---|---|---|
| चंद्रकांत |  | 18 | 4 |
| रमाकांत |  | 20 | – |
| अहमद |  | 12 | 2 |

प्रमाण : 1 चित्र = 1 षटक (6 चेंडू)

वरील तक्त्यावरून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

(1) एकूण किती गोलंदाजांची माहिती दिलेली आहे ? (2) सर्वांत जास्त धावा कोणी दिल्या ?
(3) चंद्रकांतने किती षटके टाकली ? (4) रमाकांतने किती बळी घेतले ?
(5) अहमदने एकूण किती चेंडू टाकले ? (6) चंद्रकांतने एकूण किती धावा दिल्या ?
(7) एकूण किती षटके टाकली गेली ? (8) प्रतिषटक कमीत कमी धावा कोणी दिल्या ?

या प्रश्नांच्या उत्तरांवरून लक्षात येते, की या तक्त्यावरून आपणांस चित्रांद्वारे बरीच माहिती मिळते. अशा प्रकारच्या तक्त्यांना माहितीचा चित्रालेख किंवा माहितीचे चित्ररूप असे म्हणतात.

## ❒ सांख्यिकी माहितीचे चित्ररूप


**उदा. (1)** एका पाहणीत वेगवेगळ्या प्रकारच्या घरांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे नोंदवली.

| घराचा प्रकार | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| बंगला | 4 |
| सदनिका | 20 |
| साधे घर | 8 |

आपण त्याचा चित्रालेख तयार करू. क्रिकेटमधील षटकांसाठी चेंडूचे चित्र वापरले. मुलांसाठी कोणते चित्र वापरावे ? अर्थातच  असा एखादा चेहरा हे चित्र योग्य ठरेल.

20 मुलांसाठी 20 चेहरे काढायचे का ?

तशी आवश्यकता नसते. माहितीतील संख्यांचे निरीक्षण करून योग्य ते प्रमाण ठरवणे सोईचे असते. जसे, दिलेल्या माहितीतील तीनही संख्यांना 4 ने भाग जातो, म्हणून 4 विद्यार्थ्यांसाठी एक चित्र दाखवले, तर बंगल्यात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 1 चित्र, सदनिकांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 5 चित्रे आणि साध्या घरांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 2 चित्रे दाखवावी लागतील. चित्रे काढल्यावर आपला चित्रालेख खालीलप्रमाणे दिसेल.

| घराचा प्रकार | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|
| बंगला |  |
| सदनिका |  |
| साधे घर |  |

प्रमाण : 1 चित्र = 4 विद्यार्थी

सांख्यिकी माहिती चटकन समजावी, हा चित्रालेखाचा हेतू असतो. लक्षात घ्या, की येथील सांख्यिकी माहितीतील सर्व संख्यांना 2 ने सुद्धा भाग जातो, म्हणून 2 विद्यार्थ्यांसाठी एक चित्र असेही प्रमाण घेता येईल. तसे प्रमाण घेतले, तर चित्रांची संख्या वाढेल. त्यामुळे चित्रालेखावरून माहिती चटकन समजणे सुकर होणार नाही.

चित्रालेख काढण्यासाठी आपल्याला –

- सांख्यिकी माहितीतील संख्यांचे निरीक्षण करावे लागेल.
- त्या संख्या कोणकोणत्या संख्यांच्या पाढ्यांत आहेत, हे पाहावे लागेल.
- योग्य प्रमाण निश्चित करावे लागेल.
- योग्य चित्र, चिन्ह म्हणून निवडावे लागेल.
- योग्य ते रकाने करून चित्रालेख काढावा लागेल.
- चित्रालेखाच्या खाली प्रमाण लिहावे लागेल.




**उदा. (2)** शाळेतील 150 विद्यार्थ्यांचे पालक कोणता मुख्य व्यवसाय करतात याची विद्यार्थ्यांकडून संकलित केलेली माहिती दिली आहे. त्या आधारे या माहितीचा चित्रालेख तयार करा.

| विद्यार्थ्यांच्या पालकांचा व्यवसाय | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| शेती | 60 |
| खासगी नोकरी | 20 |
| सरकारी नोकरी | 30 |
| इतर व्यवसाय | 40 |

दिलेल्या सर्व संख्यांना 2, 5 व 10 या संख्यांनी भाग जातो. '10 विद्यार्थ्यांसाठी 1 चित्र' हे प्रमाण सोईचे होईल, म्हणून 60 विद्यार्थ्यांसाठी 6 चित्रे, 20 विद्यार्थ्यांसाठी 2 चित्रे, 30 विद्यार्थ्यांसाठी 3 चित्रे आणि 40 विद्यार्थ्यांसाठी 4 चित्रे काढावी लागतील.

माहितीचे स्वरूप लक्षात घेऊन 10 विद्यार्थ्यांसाठी '  ' हे चित्र वापरू.

आपला चित्रालेख खालीलप्रमाणे दिसेल.

| विद्यार्थ्यांच्या पालकांचा व्यवसाय | विद्यार्थी संख्या |
|---|---|
| शेती |  |
| खासगी नोकरी |  |
| सरकारी नोकरी |  |
| इतर व्यवसाय |  |

प्रमाण : 1 चित्र = 10 विद्यार्थी

## उदाहरणसंग्रह 52

**1.** एका गोदामात विविध प्रकारच्या धान्यांचा साठा खालीलप्रमाणे आहे. दिलेल्या सांख्यिकी माहितीवरून चित्रालेख तयार करा.

| धान्य | पोती |
|---|---|
| तांदूळ | 40 |
| गहू | 56 |
| बाजरी | 8 |
| ज्वारी | 32 |

**2.** वडगावमध्ये असणाऱ्या विविध वाहनांची माहिती दिली आहे. दिलेल्या माहितीवरून चित्रालेख काढा.

| **वाहनाचा प्रकार** | **संख्या** |
|---|---|
| सायकल | 84 |
| स्वयंचलित दुचाकी | 60 |
| चारचाकी (कार/जीप) | 24 |
| मोठी वाहने (ट्रक, बस इ.) | 12 |
| ट्रॅक्टर | 24 |

**3.** शाळेच्या ग्रंथालयातील एका कपाटात असणाऱ्या विविध पुस्तकांची संख्या दिली आहे. दिलेल्या सांख्यिकी माहितीवरून चित्रालेख तयार करा.

| **विषय** | **पुस्तके** |
|---|---|
| विज्ञान | 28 |
| क्रीडा | 14 |
| कविता | 21 |
| कथा | 35 |
| इतिहास | 7 |

**उपक्रम**

खालील मुद्द्यांच्या आधारे माहिती संकलित करा व त्या माहितीचा चित्रालेख तयार करा.

(1) वर्गातील विद्यार्थ्यांच्या शेतात कोणत्या प्रकारचे पीक घेतले जाते ? (भाजीपाला, धान्य, डाळी, फळे इत्यादी.)

(2) वर्गातील विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारच्या गोष्टींची पुस्तके आवडतात ? (परीकथा, राजा-राणी यांच्या कथा, ऐतिहासिक कथा, संतांच्या गोष्टी, चित्रकथा इत्यादी.)

(3) वर्गातील विद्यार्थ्यांना मोठेपणी कोण व्हावे असे वाटते ? (डॉक्टर, शिक्षक, शेतकरी, इंजिनिअर, अधिकारी इत्यादी.)

✦✦✦